महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२६/ 844

दिनांक :- 25 MAR 2026

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- तृतीय पंथीयांचे हक्क, समस्या या अनुषंगाने उपाययोजना करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/तृतीयपंथीयांचे हक्क/२०२६/१६४ दिनांक २५/३/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या संदर्भीय पत्रान्वये मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली **"तृतीयपंथीयांचे हक्क, समस्या आणि इतर बाबींबाबत"** दिनांक १०/६/२०२५ आणि दिनांक १०/९/२०२५ रोजी बैठक झाली. सदर बैठकीचे इतिवृत यासोबत जोडले असून त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, तृतीयपंथीयांचे हक्क, समस्या आणि इतर बाबींबाबत खालील प्रमाणे ठळक मुद्दे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

१. तृतीयपंथीयांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश नाकारण्यात येऊ नये.

२. संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या नोंदीवर शाळा / महाविद्यालय सोडण्याचा दाखला, गुणपत्रक यावर लिंग नमूद करतांना तृतीयपंथी यांचा पर्याय उपलब्ध करुन द्यावा.

(डॉ. व्हि. आर. मानकर)

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती

**सहपत्र :-** वरिल प्रमाणे.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७

ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २/एनजीसी/तृतीयपंथीयांचे हक्क/२०२६/७८४ दिनांक: 25 MAR 2026

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे

विषय:- तृतीय पंथीयांचे हक्क, समस्या या अनुषंगाने उपाययोजना करणे

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२५/समन्वय, दि ४.३.२०२६

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, मा.मंत्री महोदय,सामाजिक न्याय व मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली "तृतीयपंथीयांचे हक्क, समस्या आणि इतर बाबींबाबत" दिनांक १०.६.२०२५ आणि दिनांक १०.९.२०२५ रोजी बैठक झाली. सदर बैठकीच्या इतिवृतात नमुद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संदर्भाधीन शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार आपल्या विभागातील सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना पुढील बाबी तात्काळ कळविण्यात याव्यात.

१. तृतीयपंथीयांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश नाकारण्यात येऊ नये.
२. संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या नोंदीवर शाळा/महाविद्यालय सोडण्याचा दाखला, गुणपत्रक यावर लिंग नमूद करताना तृतीयपंथी यांचा पर्याय उपलब्ध करुन दयावा.

आपल्या विभागातील सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत त्वरीत निर्देश देण्यात यावेत व त्याबाबत संचालनालयास अवगत करावे.

( डॉ.विनोद मोहितकर )

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांकः- संकीर्ण -२०२६/प्र.क्र. २५/समन्वय      दिनांकः- ०४ मार्च, २०२६.

प्रति,

१) सहसचिव/ उपसचिव, ( मशि/विशि/ तांशि/ साशि),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- तृतीयपंथीयांचे हक्क, समस्या या अनुषंगाने उपाययोजना करणे या विषयाबाबत मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/९/२०२५ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

सोबत सामाजिक न्याय विभागाचे क्रमांक बैठक-२०२५/ प्र.क्र. २२४/ सामासु, दिनांक २७/१/२०२६ चे पत्र व सहपत्र पाठविण्यात येत आहे.

२. मा. मंत्री ( सामाजिक न्याय व मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली "तृतीयपंथीयांचे हक्क, समस्या आणि इतर बाबींबाबत" दिनांक १०/९/२०२५ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्तातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधीत मुद्यांबाबत बैठकीत मा. राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास सादर करण्यात यावा. व त्याची एक प्रत या कार्यासनास पाठविण्यात यावी, ही विनंती.

आपली,

स.पं.जाधव

( संचिता जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

F:\RUPESH\cr०१-२६- General Endorsement.docx

E-9811074

जा.क्र. ७६/समन्वय
२६/२/२६

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तारीत इमारत, मुंबई-४०००३२

दूरध्वनी क्र .०२२-२२८२०२०१ ई-मेल : so.samasu@maharashtra.gov.in

क्रमांक: बैठक-२०२५/प्र.क्र.२२४/सामासु दिनांक : २७.०१.२०२६

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 413
दि. २४/०२/२६

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, (कारागृहे), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, गृह निर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण, गो. ते. रु. प्रशासकीय इमारत, मुंबई
११. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते. रु. प्रशासकीय इमारत, मुंबई.
१२. सचिव, (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे.
१४. अप्पर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण

**विषय :-** तृतीयपंथीयांचे हक्क, समस्या या अनुषंगाने उपाययोजना करणे या विषयाबाबत मा.राज्यमंत्री (सा.न्या.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१०.०९.२०२५ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

राज्यातील तृतीयपंथीयांच्या विविध विषयांबाबत मा. राज्यमंत्री (सा. न्या.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृह क्र.५, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे दि.१०.०९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती.

०२. सदर बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे. तसेच, सोबतच्या इतिवृत्तात नमुद केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करावा, ही विनंती.

२७/०१/२०२६

(विवेक शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

उ.स.-(समन्वय)

प्रत :- माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१. मा. मंत्री (सा. न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२३/२
२४/२

२. मा. राज्यमंत्री (सा. न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सा. न्या.व.वि.स.वि. यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. सह सचिव / उप सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. डॉ. सान्वी जेठवानी, सह उपाध्यक्ष, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
७. सलमा खान, मुंबई, सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
८. ॲड शिवानी सुरकार, जि. वर्धा, सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
९. प्रिय पद्मपाणी, जि. ठाणे; सदस्य राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१०. रिया आळवेकर, जि. सिंधुदुर्ग, सदस्य राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
११. पार्वती परशुराम जोगी, जि. धुळे, सदस्य राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१२. शितल बजरंग शेंडे, जि. अमरावती, सदस्य राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ,
१३.ॲड. पवन यादव, मुंबई सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१४. श्रीम. मयुरी शिवाजीराव आळवेकर, जि. कोल्हापुर सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१५. डॉ. योगा नंबियार, जि. ठाणे, सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१६. श्रीम. राणी ढवळे, जि. नागपुर, सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ,
१७. अर्पिता मुरलीधर भिसे, जि. छत्रपती संभाजीनगर, सदस्य, सदस्य राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१८. निवडनस्ती/सामासु.

# तृतीयपंथी व्यक्तींचे हक्क, समस्या आणि इतर बाबींबाबत दि.१०.०९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता परिषद सभागृह, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे मा.राज्यमंत्री ( सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीचे इतिवृत्त.

मा.मंत्री, सामाजिक न्याय व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीयांच्या विविध विषयांवर दि.११.०६.२०२५ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्तावर केलल्या कार्यवाहीचा आढावा व इतर बाबींबाबत दि.१०.०९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता परिषद सभागृह, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ यांचे सदस्य व शासनाच्या विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

१. श्रीम. सुचिता महाडीक, सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग.
२. श्री. राहुल कुलकर्णी, सह सचिव, गृह विभाग.
३. डॉ. अजय चंदनवाले, संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग.
४. श्री. रविंद्र पाटील, उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग.
५. श्रीम. सो. रा. साखरे, उपसचिव, विधि व न्याय विभाग.
६. श्री. कैलास साळुंखे, उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
७. श्री. अ. शा. मुत्याल, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
८. श्री. मदन विष्णु पाटील, पोलीस उपअधिक्षक, गृह विभाग.
९. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (दुरदृष्य प्रणालीद्वारे)
१०. श्रीम. स्वाती इथापे. उपायुक्त (ना.ह.स.), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे.
११. श्री. अ.सु. राऊत, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग.
१२. श्री. सदाशिव साळुंखे, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग.
१३. डॉ. प्रणव जाधव, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण विभाग.
१४. डॉ. सान्वी जेठवानी, सह उपाध्यक्ष, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१५. ॲड. पवन यादव, मुंबई सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१६. श्रीम. मयुरी शिवाजीराव आळवेकर, जि. कोल्हापुर सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१७. डॉ. योगा नंबियार, जि. ठाणे, सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ.
१८. श्रीम. राणी ढवळे, जि. नागपुर, सदस्य, राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ. (दुरदृष्य प्रणालीद्वारे)

०२. बैठकीच्या सुरुवातीस राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळाच्या सह उपाध्यक्ष, डॉ. सान्वी जेठवाणी यांनी स्वत:च्या आणि उपस्थित मंडळाच्या सदस्यांच्या तसेच शासनाच्या विविध विभागातील उपस्थित अधिकारी यांनी आपली ओळख करुन दिली.

०३. तदनंतर, श्री. रविंद्र शिवाजी गोरवे, उपसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य्य विभाग यांनी राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळाच्या उपस्थित सदस्य व शासनाच्या विविध विभागातील उपस्थित सदस्याचे स्वागत करुन मा.मंत्री, सामाजिक न्याय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीयांच्या विविध विषयांवर दि.११.०६.२०२५ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीच्या अनुषंगाने मा.मंत्री, सामाजिक न्याय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निदेशाबाबत अवगत केले. तसेच सदर बैठकीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे विषयसुची विषद केली.

१. मा.मंत्री, सामाजिक न्याय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीयांच्या विविध विषयांवर घेण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्तावर केलल्या कार्यवाहीचा आढावा.
२. तृतीयपंथीयांसाठी नवीन योजना तयार करणे.
३. तृतीयपंथीयांसाठी असणाऱ्या धोरणाचा आढावा.
४. तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करणेबाबत.
५. तृतीयपंथीयांसाठी ओळखपत्र देण्याबाबतच्या कामाचा आढावा.
६. तृतीयपंथीयांना स्कील डेव्हलमेंट प्रशिक्षण देण्याबाबत.
७. तृतीयपंथीयांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.
८. प्रचार प्रसिध्दी करण्याबाबत.
९. तृतीयपंथीयांची विभागीय व जिल्हास्तरीय स्थापनाचा आढावा.
१०. आयत्यावेळीचे विषय.

०४. मा.मंत्री, सामाजिक न्याय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीयांच्या विविध विषयांवर दि.११.०६.२०२५ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्तावर केलल्या कार्यवाहीचा आढावा व इतर बाबींबाबत संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत मुद्देनिहाय चर्चा झाली व मा. राज्यमंत्री (सा. न्या.) यांनी खालीलप्रमाणे निदेश दिले :-

| अ. क्र. | मुद्दा | बैठकीदरम्यान झालेली चर्चा | मा. राज्यमंत्री महोदया यांचे निदेश | कार्यवाही करणारा विभाग | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| अ) मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०६.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व त्यानुसार शासनाच्या विविध विभागाद्वारे केलेल्या कार्यवाहीबाबत मुद्देनिहाय चर्चा झाली व मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांनी खालीलप्रमाणे निदेश दिले. | | | | | |
| १. | राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य | शासनास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. | तपासुन नियमानुसार कार्यवाही करावी. | सामाजिक न्याय व विशेष | १ महिना |

(३/७)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळातील सदस्यांना भत्ता देणेबाबत. | | | सहाय्य विभाग. | |
| २. | प्रादेशिक स्तरावरील उपसमिती स्थापन व कार्यान्वित करणेबाबत. | १) छत्रपती संभाजीनगर विभाग सोडून इतर सर्व विभागात प्रादेशिक स्तरावरील उपसमिती स्थापन व कार्यान्वित झालेल्या आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये प्रादेशिक स्तरावरील उपसमिती स्थापन करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, छत्रपती संभाजीनगर यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थितीनुसार कळविले.<br>२) तसेच राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या सहउपाध्यक्ष डॉ. सान्वी जेठवानी यांनी अमरावती विभागाच्या समितीमधील सदस्य बदलण्याबाबत मागणी केली. | १) विभागस्तरावरील सर्व बैठकांची माहिती मागवून घेण्यात यावी.<br>२) सभासद सदस्य बदलण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा. | सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण | १ महिना |
| ३. | केंद्र सरकार व इतर राज्यातील तृतीयपंथीयांसाठीचे जे शासन निर्णय असतील त्यांचा अभ्यास करण्याबाबत. | आयुक्तालय स्तरावर अभ्यास सुरु असल्याचे उपायुक्त (नाहसं), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी बैठीदरम्यान कळविले. | इतर राज्यातील तृतीयपंथीयांसाठीचे जे शासन निर्णय असतील त्यांचा अभ्यास करावा तसेच राज्य महिला आयोगाचा रिपोर्ट काढून तो पण पहावा व त्यानुसार सविस्तर प्रस्ताव सादर करावा. | १.आयुक्त, समाज कल्याण.<br>२.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण.<br>३. सर्व सहायक आयुक्त, | १ महिना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | समाज कल्याण. | |
| ४. | राज्यस्तरावरील तृतीयपंथीय मंडळासाठी स्वतंत्र कार्यालय स्थापन करणे | राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळाच्या सह उपाध्यक्ष, डॉ. सान्वी जेठवाणी यांनी सदर कार्यालय मुंबई येथे असावे अशी मागणी केली. | तपासुन कार्यवाही करावी. | १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग. २. आयुक्त, समाज कल्याण, पुणे. | ३ महिने |
| ५. | तृतीयपंथीय व्यक्तींची जिल्हानिहाय सर्वेक्षण मोहीम राबविणे. | तृतीयपंथी व्यक्तींची सर्वेक्षण मोहिम तातडीने पुर्ण करावी अशी विनंती उपस्थित अशासकीय सदस्यांनी केली. | तृतीयपंथी व्यक्तींची जिल्हानिहाय सर्वेक्षण मोहिम राबविण्यासाठी प्रस्ताव तयार करावा. | १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग. २. आयुक्त, समाज कल्याण, पुणे. | १ महिना |
| ६. | राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळातील तृतीयपंथीय सदस्यांसाठी शासकीय विश्रामगृहामध्ये कक्ष आरक्षित करण्याबाबत. | सर्व उपायुक्त, समाज कल्याण यांना याबाबत कळविण्यात येत आहे. | योग्य ती कार्यवाही करावी. | १.आयुक्त, समाज कल्याण. २. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई. ३. सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई. | - |
| आ) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०६.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व त्यानुसार शासनाच्या विविध विभागाद्वारे केलेल्या कार्यवाहीबाबत मुद्देनिहाय चर्चा झाली व मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. | | | | | |
| १. | जेष्ठ नागरीक कक्ष आणि तृतीयपंथीय कक्ष या कक्षांसाठी समन्वय अधिकारी नेमणेबाबत. | समन्वय अधिकारी हा अशासकीय सदस्य असावा अशी मागणी राज्य कल्याण मंडळाच्या सह उपाध्यक्ष, डॉ. सान्वी जेठवाणी यांनी केली | शासकीय अधिकाऱ्याची समन्वय अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात यावी. | १.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (समन्वय विभाग) २.सर्व विभाग | १ महिना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | राज्यस्तरीय तृतीयपंथी संरक्षण कक्ष स्थापन करणे आणि तुरुंगात असलेल्या तृतीयपंथी व्यक्तींची काळजी व उपचार करणे | १. राज्यस्तरीय तृतीयपंथी संरक्षण कक्ष स्थापन केला असून तेथे अतिरीक्त पोलीस महानिदेशक (ADG) स्तराचा नोडल ऑफीसर नेमला आहे असे पोलीस महासंचालक कार्यालयातील प्रतिनिधींनी सांगितले.<br><br>२. तसेच सी.पी.ऑफीस मार्फत लिंग संवेदनशिलतेचा (Gender Sensitisation) प्रोग्राम घेण्यात यावा अशी मागणी राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या सहउपाध्यक् सान्वी जेठवानी यांनी केली | तुरुंगात असलेल्या तृतीयपंथी व्यक्तींसाठी एक वेगळा सेल तयार करावा आणि तेथे त्यांना ठेवण्यात यावे तसेच वेगळ्या शौचालयाची सोय करावी.<br>२. तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजना, धोरणे तसेच त्यांच्यासाठी असलेले कायदे, नियम इत्यादींबाबत परिपत्रक काढुन अवगत करण्यात यावे.<br>३. लिंग संवेदनशिलतेबाबतचे (Gender Sensitisation) कार्यक्रम ठेवण्यात यावेत. | गृह विभाग, मंत्रालय, मुंबई/ अप्पर पोलीस महासंचालक, (म. रा.), मुंबई. | १ महिना |
| ३. | तृतीयपंथी आरोग्य व्यक्तींचे एलजीबीटीक्यू तसेच कम्युनिटीबाबत भेदभावरहित वागणूक देणेबाबत, आरोग्य विभाग / वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत रुग्णालये / वैद्यकीय महाविद्यालयामध्ये तृतीयपंथी | तृतीयपंथी व्यक्तींसाठी स्वतंत्र खाटा/कक्ष आरक्षित करणेबाबत संबंधितांना कळविण्यात आल्याचे संबंधित विभागाच्या उपस्थित अधिका-यांनी अवगत केले. तसेच तृतीयपंथी व्यक्तीसाठी हार्मोनल असमतोल टाळण्यासाठी आवश्यक आवश्यक औषधोपचार मोफत देण्याबाबत शासकीय रुग्णालयाच्या अधिक्षकांना कळविण्यात | तपासुन योग्य ती कार्यवाही करावी. | सार्वजनिक आरोग्य विभाग/ वैद्यकीय शिक्षण विभाग. | ३ महिने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रूग्णांसाठी काही खाटा आरक्षित ठेवणे, राज्यातील सर्व रूग्णालये व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये लिंग (Gender Sensitisation) संवेदनशीलतेवरील प्रशिक्षण बंधनकारक करण्यात यावे, तृतीयपंथी रूग्णासाठी ब्रेस्ट इम्प्लांट, HRT (Hormone Replacement Therapy) SRS (Sex Reassignment Surgery) व तत्सम उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देणे, तृतीयपंथी व्यक्ती यांना हार्मोनल असमतोल टाळण्यासाठी आवश्यक औषधोपचार मोफत व सवलतीच्या दरात उपलब्ध करणे. | आल्याचे उपस्थित वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या अधिका-यांनी अवगत केले. | | | |
| ४. | शासकीय निमशासकीय सेवांमध्ये तृतीयपंथी व्यक्तींना १ % समांतर आरक्षण लागू करण्यात यावे; महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व | स्पर्धा परीक्षेमध्ये तृतीयपंथी व्यक्तींना आरक्षण नसल्याने तृतीयपंथी पर्याय उपलब्ध करता येत नसल्याचे संबंधित विभागाच्या उपस्थित अधिका-यांनी अवगत केले. | तपासुन कार्यवाही करावी. | सामान्य प्रशासन विभाग. | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | भरती प्रक्रीयेसाठी तृतीयपंथी पर्याय उपलब्ध करणे; तृतीयपंथी व्यक्तीच्या तृतीयपंथी प्रमाणपत्राबाबत. | | | | |
| ५. | शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण शुल्क माफीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळण्यामधील अडचणीबाबत. | उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून दि.७ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावरील सर्व शैक्षणिक आस्थापनांना कळविण्यात आल्याचे संबंधित विभागाच्या उपस्थित अधिका-यांनी अवगत केले. तसेच त्याबाबत पुन:श्च निदेश देण्यात येतील याबाबत कळविले आहे. तसेच तृतीयपंथी व्यक्तींना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश नाकारण्यत येवु नये याबाबत सर्व क्षेत्रीय स्तरावरील सर्व शैक्षणिक आस्थापनांना कळविण्यात आल्याचे तसेच पुन:श्च निदेश देण्यात येतील याबाबत कळविले आहे. | तृतीयपंथीयांना शाळा महाविद्यालयामध्ये प्रवेश नाकारल्या जातात, त्यामध्ये सुधारणा करावी. तसेच दि.७ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयाची कडक अंवलबाजावणी करण्यात यावी. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | - |
| ६. | गृहनिर्माण धोरणामध्ये तृतीयपंथीयांचा समावेश करणे, तृतीयपंथी व्यक्तींना हक्काचे घर उपलब्ध करणे. | तृतीयपंथीयांना म्हाडा, प्रधानमंत्री आवास योजना, अर्ज करण्यामध्ये तृतीयपंथी ऑप्शन देण्याची मागणी राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या उपस्थित सदस्यांनी केली. | शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याच्या अनुषंगाने भरावयाच्या अर्ज प्रणालीमध्ये तृतीयपंथीय पर्याय | गृहनिर्माण विभाग | - |

विशि-३

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तसेच म्हाडा, प्रधानमंत्री आवास योजना, अर्ज करण्यामध्ये तृतीयपंथी ऑप्शन द्यावे. | | उपलब्ध करुन देण्यात यावा | | |
| ७. | तृतीयपंथी व्यक्तीना शिधापत्रिका देण्यासाठी आवश्यक कागदपत्रामध्ये शिथिलता देणेबाबत. | तृतीयपंथी व्यक्तींची शिधापत्रिकेसाठी आवश्यक कागदपत्रे नसल्याने शिधापत्रिका मिळण्यास होणारी गैरसोय लक्षात घेता त्यांना शिथिलता देण्याची मागणी राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या उपस्थित सदस्यांनी केली. | तपासुन योग्य ती कार्यवाही संबंधित विभागाने करावी. | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | - |
| ८. | तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणाच्या विविध योजना सामाजिक न्याय विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. | तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणाच्या विविध योजना सामाजिक न्याय विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याची मागणी राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या उपस्थित सदस्यांनी केली. | तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणाच्या विविध योजना सामाजिक न्याय विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | - |
| ९. | पोलीस भरतीबाबत. | तृतीयपंथीयांना पोलीस भरतीमध्ये शिथिलता द्यावी अशी मागणी राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या सह उपाध्याक्षा डॉ. सान्वी जेठवाणी यांनी केली | संबंधित विभागाने तपासुन कार्यवाही करावी. | गृह विभाग | - |
| १०. | शासनाच्या सर्व विभागांमध्ये तृतीयपंथी ऑप्शन द्यावे. | शासनाच्या सर्व विभागांमध्ये तृतीयपंथी ऑप्शन देण्याची मागणी राज्यस्तरीय तृतीयपंथीय मंडळाच्या उपस्थित सदस्यांनी केली. | शासनाच्या सर्व विभागांमध्ये तृतीयपंथी ऑप्शन देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी. | सर्व प्रशासकीय विभाग. | - |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११. | तृतीयपंथी प्रमाणपत्राबाबत. | तृतीयपंथी व्यक्तीचे पूर्वीचे नाव व बदललेले नाव याबाबत राजपत्राचा आग्रह न धरता इतर शासनमान्य आवश्यक कागदपत्राची/प्रमाणपत्राची खातरजमा करून नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत सामाजिक न्याय विभागाकडुन यापुर्वी संबंधित विषयाच्या अनुषंगाने झालेल्या दि.११.०६.२०२५ च्या बैठकीमध्ये संबंधित विभागास कळविले आले आहे. | संबंधित विभागाने तपासुन कार्यवाही करावी. | सामान्य प्रशासन विभाग. | | - |
| १२. | तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ व तृतीयपंथी (हक्कांचे संरक्षण) नियम, २०२० च्या अनुषंगाने तृतीयपंथी धोरणाची अंमलबजावणी करणे. | सामाजिक न्याय विभागाने दि.११ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या तृतीयपंथी व धोरणाच्या अनुषंगाने तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी सर्व प्रशासकीय विभागाकडून करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना पुनःश्च अवगत करण्यात आले. | सर्व प्रशासकीय विभागांनी धोरणामध्ये निदेशित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. | सर्व प्रशासकीय विभाग. | | - |
| १३. | तृतीयपंथीयांसाठी सार्वजनिक ठिकाणी स्वतंत्र स्वच्छतागृह करणे | तृतीयपंथीयांसाठी यावर्षी रु.१५.०० कोटीची तरतूद आहे. त्यामधून काही महानगरपालिका, नगरपालिका, तसेच एसटी बसस्थानक व तीर्थस्थळे असणाऱ्या ठिकाणचे बस स्थानकामध्ये तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह | - | सामाजिक न्याय/ नगरविकास (नवि-२)/ गृह (परिवहन) विभाग | तात्काळ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उभारण्यासाठी ही तरतूद उपलब्ध करुन देणे. | | | |
| १४. | तृतीयपंथीयांसाठी वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय जिल्हा रुग्णालयामधील मानसोपचार तज्ञांची मदत देण्यात यावी | वैद्यकीय शिक्षण सचिव यांना सर्व वैद्यकिय महाविद्यालयात व सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मानसोपचार तज्ञांच्या सेवा तृतीयपंथीयांना उपलब्ध करुन द्याव्यात. | | सार्वजनिक आरोग्य/ वैद्यकिय शिक्षण विभाग | १ महिना |
| १५. | शासनाच्या सर्व योजनांच्या अर्जामध्ये लिंग पर्यायांमध्ये तृतीयपंथी हा पर्याय लिहिणे बाबत | मंत्रालयीन सर्व विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. | | सर्व प्रशासकीय विभाग | ३ महिने |
| १६ | शाळा महाविद्यालय यामध्ये लिंग पर्यायांमध्ये तृतीयपंथी हा पर्याय लिहिणे बाबत | शालेय शिक्षण विभाग, उच्च तंत्र शिक्षण विभाग यांनी विद्यार्थ्यांच्या नोंदीवर शाळा/ महाविद्यालय सोडण्याच्या दाखला, गुणपत्रक यावार लिंग नमुद करताना तृतीयपंथी यांचा पर्याय उपलब्ध करुन द्यावा. | | शालेय शिक्षण/ उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ३ महिने |
| १७ | तृतीयपंथींसाठी शाळा /महाविद्यालयात शिक्षण मिळणे बाबत मोफत | उच्च शिक्षण विभागाने मुलींना शैक्षणिक शुल्क माफ करण्याचे आदेश काढले आहेत. त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विभागाने तृतीयपंथीयासाठी शैक्षणिक शुल्क माफ करावे. | | शालेय शिक्षण विभाग | ३ महिने |
| १८ | जेलमध्ये तृतीयपंथींसाठी वेगळा सेल तयार करावा स्वतंत्र कक्ष तसेच पोलीस | तृतीयपंथीयांना जेल मध्ये स्वतंत्र तृतीयपंथीयांना सामाजिक व लैंगिक छळास सामोरे जावे लागते त्यासाठी जेल मध्ये स्वतंत्र तयार करण्यात यावा. | | गृह विभाग | ३ महिने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | स्टेशन स्वतंत्र यंत्रणा (कक्ष) | | | | |
| १९ | तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र हेल्पलाइन तयार करणे | चाइल्ड हेल्पलाइन प्रमाणे तृतीयपंथीयांसाठी हेल्पलाइन तयार करावी ज्यामध्ये तृतीयपंथी यांना मानसोपचार तज्ञ यांचा सल्ला व मार्गदर्शन मिळेल | | गृह/ सामाजिक न्याय विभाग | ३ महीने |
| २० | नांदेड येथे किन्नर भवन उभे करणे | जिल्हाधिकारी नांदेड यांनी किन्नर भवनसाठी ३.५ एकर जागा सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे दिलेली आहे. याबाबत प्रस्ताव सादर करावा | | सामाजिक न्याय विभाग | १ महिना |
| २१ | एस टी महामंडळ मध्ये महिलांसाठी तिकीटामध्ये ५०% सवलत आहे त्या धर्तीवर तृतीय पंथीयांसाठी तिकिटांमध्ये ५०% सवलत देण्यात यावी. | तृतीयपंथीयांना एसटी महामंडळाच्या बसच्या प्रवासात महिला प्रवाशांना दिलेल्या सवलती प्रमाणे तिकीटामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी | | गृह (परिवहन) विभाग | ३ महिने |
| २२ | महिलांसाठी एसटी महामंडळामध्ये राखीव आसन असते त्याचप्रमाणे तृतीयपंथीयांसाठी एक आसन आरक्षित ठेवावे | तृतीयपंथीयांना प्रवासामध्ये सामाजिक व लैंगिक छळाबाबत समोरे जावे लागते यासाठी एस.टी बसमध्ये १ आसन तृतीयपंथीयांसाठी आरक्षीत ठेवावे. | | गृह (परिवहन) विभाग | ३ महिने |
| २३ | तृतीयपंथीयांसाठी संकेतस्थळ तसेच स्वतंत्र मोबाईल ॲप्लिकेशन तयार करावे. | तृतीयपंथीयांच्या योजनांची माहिती देणेसाठी त्यांची नोंद करण्यासाठी संकेतस्थळ तयार करावे तसेच त्यांची नोंदणी करण्यासाठी मोबाईल ॲप्लीकेशन तयार करणे. | | सामाजिक न्याय/ माहिती व तंत्रज्ञान विभाग | ३ महिने |
| २४ | सामाजिक न्याय विभागाच्या | सामाजिक न्याय विभागाच्या संकेतस्थळावर | | सामाजिक न्याय/ | १ महिना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | संकेतस्थळावर तृतीयपंथी यांच्या नोंदणी बद्दलची लिंक दर्शविणे. | तृतीयपंथीयांच्या योजनांची माहिती द्यावी त्यांची नोंदणी करण्याची लिंक द्यावी | | माहिती व तंत्रज्ञान विभाग | |
| २५ | तृतीयपंथीयांच्या प्रश्नाबाबत शासकीय स्तरावर संवेदनशील मुद्याबाबत जागृती करणेसाठी कार्यशाळेचे आयोजन करणे. | शाळेतील शिक्षक, पोलीस शासकीय मानसोपचार तज्ञ समाज कल्याण अधिकारी, डॉक्टर, तृतीसपंथीयांसाठी कार्य करणारे कार्यकर्ते, जनसंपर्क असणा-या शासकीय विभागाचे अधिकारी इत्यादींना या विषयांवर संवेदनशिल (सेन्सटाईझेशन) करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. | | सामाजिक न्याय विभाग गृह विभाग, वैद्यकिय शिक्षण शालेय शिक्षण विभाग, इतर संबंधित विभाग. | २ महिने |
| २६ | महिलासाठीच्या वर्किंग वुमन्स होस्टेल च्या धर्तीवर तृतीयपंथीयांसाठी होस्टेल तयार करणे. | प्रायोगिक तत्त्वावर सामाजिक न्याय विभागाच्या सध्या अस्तित्वात असणाऱ्या पुणे, मुंबई, नागपूर येथील वर्किंग वुमन्स होस्टेलमधील एक खोली राखीव ठेवण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. | | सामाजिक न्याय विभाग | १ महिना |
| २७ | प्रचार प्रसिध्दी करणे | तृतीयपंथीयांमधील यशस्वी व्यक्तींच्या कार्याची प्रसिद्धी करणे. तसेच समाजाने तृतीयपंथीयासोबत भेदभाव करू नये याबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रचार प्रसिद्धी करावी. त्याचा आराखडा सादर करावा. | | सामाजिक न्याय विभाग | १ महिना |

उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपन्न झाली.

***